महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, २ रा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.
Email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdbm@indiatimes.com
Tel.No:- Jt. Commr: 22660152, Dy.Commr.26265569, FAX No. 22662370

विषय:-शुध्द / अतिशुध्द मद्यार्कांची परराज्यात निर्यात करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

वाचा :-१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.एफएलआर ११२०००/४७२०५/५ब दि.२३.४.२००१.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.डिएनएस ११२००१/५७६८८/अकरा दि.९.८.२००१.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.डिएनएस ११२००१/५७६९८/अकरा दि.८.४.२००२.

## परिपत्रक

क्रमांक :-डिवायएस ११२००५/मद्यार्क निर्यात/चार                मुंबई २० जून, २००५.

गेल्या तीन वर्षापासून राज्यातील अवर्षणाच्या परिस्थितीमुळे ऊसाच्या लागवडीवर व त्यामुळे मळी उपलब्धतेमध्ये अनिष्ट परिणाम झाला असून पर्यायाने राज्यात मद्यार्कांची टंचाई निर्माण झाली आहे. त्यासाठी मळी व मद्यार्क यांच्या निर्यातीस प्रतिबंध करण्यासाठी निर्यात शुल्कात वाढ करुन आयात शुल्क कमी करण्याचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

मध्यप्रदेश, गोवा व दमण या राज्याना निर्यात केलेल्या मळी/मद्यार्कापासून मद्यार्क व मद्य तयार करुन ते अवैध मार्गाने महाराष्ट्रात पाठविल्याच्या घटना यापूर्वी निदर्शनास आलेल्या आहेत. सदर प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये व राज्याचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून या राज्यातील घटकांना होणाऱ्या निर्यातीवर पुन्हा नियंत्रण आणणे आवश्यक झाले आहे. विभागाकडे असलेला अपुरा जवान संवर्ग, मात्र पथरक्षणा अभावी होणारी वाहतुक ही मद्यार्कांचा दुरुपयोगास कारणीभूत ठरु शकते. त्यामुळे अपुरा कर्मचारी वर्गाचा जास्तीतजास्त उपयोग करणे आवश्यक आहे. त्यासाठी संदर्भीय क्र.३ चे परिपत्रक याद्वारे रद्द करण्यात येत असून पुढीलप्रमाणे सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत व क्र.१ व २ वरील परिपत्रके पूर्वीप्रमाणेच अंमलबजावणीसाठी कार्यरत राहतील.

अ) मद्यार्कांची निर्यात

१. ज्या घटकांना ५०,००० ब.लि.परिमाणा पर्यंत पेय मद्यासाठी मद्यार्कांची निर्यात करावयाची आहे अशा घटकांना निर्यातीस जिल्हाधिकारी यांनी परवानगी द्यावी. परंतु ज्या घटकांना ५०,००० ब.लि. परिमाणाच्या वर मद्यार्कांची निर्यात करावयाची आहे अशा सर्व घटकांनी मद्यार्कांची निर्यात करण्यापूर्वी या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील

२. गोवा, दमण व मध्यप्रदेश या राज्यातील सर्व घटकांना मद्यार्कांची निर्यात करण्यापूर्वी आयुक्त कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

ब) परवाने मंजूरीतील विलंब

मद्यार्कांच्या निर्यातीस अधीक्षकांच्या कार्यालयात व विविध आसवन्यांत विनाकारण अडथळे आणुन मद्यार्कांचे टँकर्स दीर्घ काळ अनावश्यक उभे करुन ठेवत असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. सबब सूचना निर्गमित करण्यात येत आहेत की, अधीक्षकांनी आयातदार घटकांच्या आयात परवान्यावरील परिमाणा इतक्या परिमाणाच्या मद्यार्कांच्या निर्यातीस परवानगी दिल्यानंतर संबंधित आसवन्यांत मद्यार्क भरण्यासाठी टँकर्स आसवनीच्या प्रवेशद्वारातुन आत आल्यापासून कोणत्याही परिस्थितीत २ तासांच्या अवधीत मद्यार्क भरण्याची प्रक्रिया सुरु होणे आवश्यक आहे व मद्यार्क भरुन झाल्यानंतर कागदपत्रांची पुर्तता करुन टँकर्स मध्ये मद्यार्क भरल्यानंतर अर्ध्या तासाच्या आत आसवनीबाहेर जाण्यास परवानगी देणे प्रभारी अधिकाऱ्यावर बंधनकारक राहील. यापुढे टँकर्स भरण्यास, कागदपत्रे देण्यास विलंब लागल्याच्या तक्रारी आल्यास त्याबाबत अधीक्षकांना जबाबदार धरण्यात येणार आहे. सबब अधीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व आसवन्यांमधून मद्यार्कांची निर्यात विनाअडथळा व विनाविलंब होईल हे पहाण्याची दक्षता घ्यावी.

क) पथरक्षण

१) पथरक्षणासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने त्यांचा जास्तीस जास्त योग्य पध्दतीने वापर करण्यात यावा म्हणून सर्व साधारणपणे एकावेळी १ ते १० टँकर मागे १ पथरक्षक जवान / अधिकारी देण्यात यावा. convey मध्ये मद्यार्क जात असल्यास १५ टँकरपर्यंत १ पथरक्षक असल्यास हरकत नसावी.

२) पथरक्षण अंतिमस्थळापर्यंत राहील.

३) पथरक्षक जवानाने / अधिकाऱ्याने पेय मद्यासाठी मद्यार्क अंतिम स्थळापर्यंत पोहोचविले की नाही याची पडताळणी करण्याची संपूर्ण जबाबदारी अधीक्षकांची राहील.

४) पथरक्षणासाठी जवान / अधिकारी तातडीने उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही अधीक्षकांची राहील. जवाना / अधिकाऱ्याच्या अभावी वाहतुकीस अडचण निर्माण होणार नाही हे जातीने पाहण्याची व याबाबत तक्रारी आल्यास अधीक्षकांना जबाबदार धरण्यात येईल.

ड ) निर्यातीसाठी मद्यार्क नियमनाचा कालावधी

ज्या आसवन्यांतील पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांची संख्या एकापेक्षा अधिक आहे अशा आसवन्यांत सकाळी ७ ते रात्री १० पर्यंत मद्यार्क टँकरमध्ये भरण्याची मुभा देण्यास हरकत नाही.

इ) इतर दक्षता

मद्यार्काची निर्यात महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात) नियमावली १९६३ मधील तरतूदीनुसार करण्यात येत असल्यामे, संदर्भिय क्र.१ च्या परिपत्रकात विहित केलेली आयात परवान्यांची सत्यता पडताळण्याची व मद्यार्क निर्यातीच्या ठिकाणी पोहोचल्याची पडताळणी करण्याची पध्दत अवलंबणे बंधनकारक राहील.

( सी.एस.संगीतराव )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह
२. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
४. सर्व प्रभारी अधिकारी, सर्व आसवन्यां.
५. अभिलेख शाखा ( ५ प्रती )